Wildlife Week - 2022

CHANDRAPUR FOREST
ACADEMY OF ADMINISTRATION,
DEVELOPMENT AND MANAGEMENT,
CHANDRAPUR

# चंद्रमा

Issue 08 | Oct. 2022







# वन्यजीव सप्ताह

“Season of festivals has begun. We foresters at the academy celebrate this array of festivals in our own ways! The bubbling batch of young foresters brought a lot of cheers to the campus with a great deal of sport and activities. Volleyball league matches and energetic stage performances to pay respects to the lord of intellect – Ganesha, marked beginning of these festivities. Celebrations of wild life week in the beginning of this month is full of activities and experiences. Veteran forest officer at a ‘young age of eighty’, Shri. V. T. Patki, with his presence in the academy and his regular participation in all the activities brought encouragement and energy to the trainees. The center of excellence for Human Wildlife interface and conflict mitigation hosted a session by Shri. Shatanik Bhagwat on the sensitive topic of electrocution being used for wildlife poaching. More than 120 participants benefitted from his field experience. The academy hostels full of participants and running at the full capacity this month brought a lot of activity in the campus. We at Chandrama look forward to host IFS officers throughout the country for the upcoming trainings at the academy this month. An emotional sendoff to our former director Shri. Maheep Gupta and with a new leader Shri. M. S. Reddy, as director to lead us further, we await more opportunities to learn!

**- Team Chandrama**”


## मुखपृष्ठाबाबत

आश्चर्यकारक जैववैविध्यानं भरलेल्या जगात सुदैवानं आपला देश या समृद्धीची खाण आहे. अन्य सजीवांच्या विविधतेबरोबरच अवघ्या जगाला भुरळ घालणारा वाघ आपल्याकडं विपुल आहे. त्यामुळं वाघ म्हटलं की आठवावा ‘भारत’ आणि भारत म्हटलं की आठवावी इथली समृद्ध वनसंपदा. या वन्यजीवांचं स्मरण, संवर्धन आणि संरक्षण महत्वाचं. यासाठी ऑक्टोबर महिन्यात आपण वन्यजीव सप्ताह साजरा करतो. या सात दिवसात वन्यजीवांच्या हितार्थ विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. सामान्य नागरिकांना यात सहभागी करून घेतलं जातं. जनमानसांत कौतुक जरी वाघांचंच जास्त, तरी निरखून पहाल तर बाकी वन्यजीवसुद्धा तितकीच मोहिनी घालतात. मग हळू हळू ध्यानात येऊ लागतं की इथं तर पावलोपावली काहीबाही वेगळं दिसतं आहे. किडे-वनस्पती-पक्षी-प्राणी. इथं नुसता टायगरच नाही तर या टायगरसोबत पाच-सात प्रकारची टायगर फुलपाखरंसुद्धा आहेत. त्यांचंही निसर्गात अनन्यसाधारण महत्व आहे. फुलपाखरापासून वाघापर्यंत पसरलेल्या या अद्भुत जीवसृष्टीचे आपण काही देणं लागतो. त्याचे उतराई होऊ. या प्लेन टायगरकडं पाहणारा हा टायगर तेच तर सांगू पाहतोय.

**- पियुषा प्रमोद जगताप, शतानिक भागवत**



# Center of Excellence for Human Wildlife Interface, Conflict Mitigation and Management






## Prevention of Wildlife poaching due to electrocution - Shatanik Bhagwat

A session was organized under the aegis of the center of excellence for human wildlife interface and conflict mitigation on the sensitive topic of electrocution. Around 120 field officers including RFO trainees and Round Officers from Forest Development Corporation of Maharashtra (FDCM) participated in the session. Various technicalities and ways to avoid electrocution were discussed in the session. Since the people being trained were the filed officers, inputs from this interaction will be useful for prevention of such cases and better vigilance. Shri. Shatanik Bhagwat, DM having great deal of experience in dealing with such cases was the resource person and the audience benefited from this session immensely. Some of the excerpts from the session are as follows… Man has evolved faster than any other animal, and accidents are inevitable if the speed increases indefinitely. We have witnessed many such accidents and electrocution is one of them. Human needs lead to the discovery of electricity which soon turned into luxury and desire. Wildlife poachers started exploiting the lethal effect of this electricity. There are two ways electricity is used for poaching. Electric fences are placed around the farm to prevent wild animals from raiding the crops. When a wild animal dies due to the fence, its flesh is consumed and sold, also in fact, safe 'electrical / solar fences' have been developed for this purpose but are not used due to several reasons. Another extreme and commercial form of electrocution is the hunting of wild animals by placing live electric wires in their habitat. From household electrical line to very high voltages of 11,000 volts are used for electrocution. Animals with soft paws like tigers, leopards, bears die instantly even from household electric shocks. When exposed to very high electrical current, any animal dies in a fraction of second. Poachers put a foot high wooden pegs in the ground at small intervals in areas where wildlife movement is common. e.g. grasslands, waterholes, farm etc. A fine centring wire is tied along with help of the pegs and an electric current is released in the wire. All this happens after sunset. In the darkness of night, if any wild animal touches the wire, it dies instantly. Due to the fault in circuit, fuse blows out or switch trips. Electric supply stops. This signals the poachers and they search along the wire for the dead animal. The animal is disposed off, the wire is wrapped and hidden; till next chance when hunting is practiced at night. It is not uncommon that farmers or passers by losing life to such electrical traps. Field staff of forest department risk their lives to patrol the electrical lines to avoid such incidents. MSEDCL also supports them. But if a person becomes wiser, such incidents will not happen. Safe electrical/solar fence should be used for agricultural crops. Due to this, wild animals will not be able to enter the farm. Crops will be protected and wildlife too will survive. It is the responsibility of every citizen to prevent such incidents of electrocution. Let us join together to build an advanced, developed and responsible country.

# महाराष्ट्र वन विकास महामंडळातील पदोन्नत वनपालांचे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम.

चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर येथे महाराष्ट्र वन विभागातील पदोन्नत वनपालांकरीता एक महिना कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन माहे फेब्रुवारी २०२२ पासून करण्यात येत असून, या प्रशिक्षणाच्या ४ तुकड्या यशस्वीपणे असून पूर्ण करण्यात आल्या आहेत. वन विभागातील अनेक विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ व्याख्यात्यांचे सत्र आयोजित करून अनेक विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

तथापि दि.०१ सप्टेंबर २०२२ पासून महाराष्ट्र वनविकास महामंडळातील वनपालांकरीता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्रथमच करण्यात आले आहे. महाराष्ट्र वनविभागातील कामकाजाची पद्धती आणि महाराष्ट्र वनविकास महामंडळाची कार्यपध्दती वेगळी असल्याने वनपालांकरीता राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमामध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले. त्यांचे कामकाजाच्या कार्यपद्धतीनुसार अनेक विषयांचा समावेश करून अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली. तसेच या विषयांच्या पुस्तकी प्रशिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक प्रशिक्षण सत्रांची जोड देऊन प्रभावी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

काही ठिकाणी महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या वन क्षेत्रामध्ये वन्यजीव अधिवास क्षेत्र, वन्यजीव भ्रमण मार्गांचा देखील समावेश आहे. अशा ठिकाणी वन्यजीव व्यवस्थापन, वन्यजीव संरक्षण, वनगुन्हे विषयक प्रकरणी कामकाज तसेच न्यायालयामध्ये प्रकरणे कशा पध्दतीने हाताळावीत याचे प्रात्यक्षिकांसहीत मार्गदर्शन तज्ज्ञ व अनुभवी व्याख्यात्यांद्वारे देण्यात आले. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कशा पध्दतीने हाताळावा याकरीता मार्गदर्शन व प्रात्यक्षिक तसेच वन्यजीव उपचार केंद्र चंद्रपूर येथे भेट देऊन आधुनिक साहित्याद्वारे वन्यप्राण्यांचा बचाव कशा पध्दतीने केला जातो याचे मार्गदर्शन अभ्यास दौऱ्याद्वारे केले गेले. तसेच मानव वन्यजीव संघर्ष हाताळतांना जमाव व्यवस्थापन कशा पध्दतीने करावे याचे देखील तज्ज्ञ व्याख्यात्यांकडून मार्गदर्शन देण्यात आले. वन्यप्राण्यांद्वारे ग्रामस्थांचे पीक नुकसान, मनुष्य हानी इ. प्रकारची प्रकरणे कशा पध्दतीने हाताळावी व त्याचा पाठपुरावा कशा पध्दतीने करावा याचे देखील मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र वनविभागाच्या पदोन्नत वनपालांच्या प्रशिक्षणापेक्षा महाराष्ट्र वन विकास महामंडळाची कार्यपध्दती वेगळी असल्याने त्याअनुषंगाने टर्न की प्रोजेक्ट, साफतोड कार्यवर्तुळ (OWR), सुधारणा कार्यवर्तुळ (IWC)









रोपवाटीका व्यवस्थापन, साग रोपवन विरळीकरण कामे व प्रात्यक्षिक यासारख्या विषयांचा नव्याने समावेश करण्यात आला व तज्ज्ञ व्याख्यात्यांना मार्गदर्शन करण्याकरीता पाचारण करण्यात आले. या व्यतिरीक्त विविध कायद्यांविषयी (माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, म.ना.से. शिस्त व अपिल नियम-१९७९ इ.) देखील मार्गदर्शन करण्यात आले. याव्यतिरिक्त वनपालांना वाचन साहित्याचा पुरवठा करण्यात आला, जेणेकरुन त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये रुजू झाल्यानंतर काही अडचण भासल्यास वाचन साहित्याचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होईल.

सद्यस्थितीत महाराष्ट्र वनविकास महामंडळातील पदोन्नत वनपालांच्या दोन तुकड्या चंद्रपूर वन प्रबोधिनी येथे प्रशिक्षित करण्यात येत आहेत. पैकी पहिली तुकडी दि.३०.०९.२०२२ रोजी कार्यमुक्त करण्यात आली.



## जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (DATI) अंतर्गत उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होणेकरीता सर्व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणेकरीता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-टी.आर.एन.-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दिनांक २३ सप्टेंबर २०११ अन्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले आहे. सेवेतील विविध टप्प्यांवर प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील शासनाचे विविध विभागातील गट-ड कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरीता शासन निर्णय क्रमांक-टी आरएन-२०१४/प्र.क्र.१२०/१४/१२-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ अन्वये चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणेकरीता चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर ही जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था घोषीत केली आहे. राज्य प्रशिक्षण धोरणास अनुसरून यशदा, पुणे अंतर्गत २०१४-१५ पासून चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर ही संस्था जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (District Administrative Training Institute) DATI म्हणून कार्यरत आहे.सन २०२२-२३ करीता वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत एकूण १६९८ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट चंद्रपूर वन प्रबोधिनीस प्राप्त झाले.

त्यानुसार जून २०२२ पासून प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे तीन दिवसीय उजळणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. दि.१३/०९/२०२२ ते १५/०९/२०२२ या कालावधीत ४९ प्रशिक्षणार्थी तसेच दि.२७/०९/२०२२ ते २९/०९/२०२२ या कालावधीत आयोजित प्रशिक्षण सत्रात ३३ प्रशिक्षणार्थ्यांचा सहभाग होता.






# मेळघाटची सफर

## (आमची पहिली अभ्यास सहल)

ही अभ्यास सहल ७ दिवसांची होती. पहिल्या दिवशी महात्मा गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमातील विश्रांती आयुष्यभरासाठी संस्मरणीय राहील. 'बापू कुटी' म्हणजे पर्यावरणीय दृष्टिकोनातलं शाश्वत निवासस्थान! सेवाग्रामातील प्रत्येक गोष्ट आम्हाला पर्यावरण वाचवण्यासाठी प्रेरित करत होती. त्यानंतर, मेळघाट व्याघ्र प्रकल्प कार्यालय, अमरावतीच्या वन्यजीव गुन्हे प्रतिबंध सेलद्वारे आयोजित सेमिनार मधून आम्ही वन्यजीवांची होणारी हत्या आणि तस्करी कशी रोखता येईल याचे धडे घेतले. संध्याकाळी रिमझिम पावसात अमरावती बांबू गार्डनचे शिल्पकार असलेल्या श्री. सलीम सरांनी बांबू गार्डनची वाटचाल, विविध बांबू प्रजाती, त्याचे उपयोग आणि बांबू उत्पादन खपासाठी मार्केट उपलब्धतेची आवश्यकता या बाबी सांगून आम्हाला तसे उपक्रम हाती घेण्यासाठी मार्गदर्शन करुन प्रोत्साहित केलं.

दुसऱ्या दिवशी सकाळचा पाऊस, चिखलदऱ्याच्या हिल स्टेशनवरील छानसं वातावरण, त्यात 'हरिकेन' मध्ये चहा आणि भज्याचा बेत म्हणजे आमच्यासाठी स्वादिष्ट ट्रीट होती. त्यानंतर, वनस्पतीशास्त्राची सखोल माहिती देणाऱ्या 'बॉटनिकल गार्डन' मध्ये प्रा. उज्वला कोकाटे मॅडमनी आमची विविध उपयोगी वृक्षांशी 'दोस्ती' करून दिली. दुपारच्या मंद उन्हात आमझरीच्या 'निसर्ग अभ्यास केंद्राकडे' वाटचाल केल्यावर, तिथे 'मृदा व जल संवर्धन' उपक्रमांतर्गत तज्ञ निवृत्त अभियंत्यांनी दिलेले सखोल विश्लेषण आम्हाला माती व पाणी वाचवण्यासाठी भविष्यात फायदेशीर ठरेल. संयुक्त वनव्यवस्थापन अंतर्गत इकोटुरिजमच्या उपक्रमामुळे स्थानिक युवकांना मिळालेले उपजीविकेचे साधन म्हणजे वन विभागाचे आदिवासी बांधवांशी असलेले सख्य दर्शवते. वनक्षेत्रातील गावांचे स्थानांतरण काळाची गरज बनलेली आहे आणि त्यासाठीची उपाययोजना कशी राबवावी याची केस स्टडी आम्हाला श्री. सुमंत सोळंके (भा.व.से.) सरांनी सांगितली. तसेच वन्यजीव संरक्षणाबाबत सहाय्यक वनसंरक्षक श्री. इंद्रजित निकम सरांनी मार्गदर्शन केले. स्थानिकांच्या राहणीमानाचा दर्जा कसा सुधारता येईल याची माहिती आम्ही मिळवली.

तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या दिवसांमध्ये आम्हाला मार्गदर्शक म्हणून लाभलेले अतिशय डॅशिंग अधिकारी श्री. रवींद्र वानखडे सर आणि श्री.




शतानिक भागवत सर! आमची निसर्ग वाचन, कोर झोन मधील जंगल सफारी आणि वन्यजीव अभ्यास सहलीची पहिलीच वेळ! जंगलातला सुगंध, मंजुळ आवाज, वाघाच्या पाऊलखुणा, साखरी नदीच्या धारा आणि चिखलामचे पाणी पिऊन आम्ही भरून पावलो. निसर्ग कसा समजून घ्यायचा, वाचायचा आणि वाचवायचा याचे धडे सरांनी खुबीने आमच्याकडून गिरवून घेतले. संकल्पना सांगताना त्यासोबत केस स्टडीची जोड दिली. एका सक्षम अधिकाऱ्याला विविध कायद्यांचं पुरेसं ज्ञान असणं खूपच आवश्यक असतं अन्यथा निडरतेने व प्रभावीपणे काम करणं अवघड जातं हे आम्हाला समजले. गस्त कधी, केव्हा, कशी आणि किती वेळा करायची त्यासोबतच स्थानिकांकडून माहिती कशी मिळवायची याबाबत शिकलो. गस्तीसाठी GPS उपकरण कसे वापरावे याबाबत प्रात्यक्षिकासह माहीती श्री. बहाळे (प्राचार्य FTI, चिखलदरा) सरांनी दिली. पाचव्या दिवसाचा शेवट सिपना नदीच्या किनारी निसर्ग शिक्षण व निर्वाचन केंद्र, सेमाडोह याची माहिती घेऊन झाला.

सहाव्या आणि शेवटच्या म्हणजे सातव्या दिवशी आम्ही जाणून घेतले की, शासकीय पदावरून ज्ञान आणि शक्तीचे रूपांतर स्थानिकांच्या हितात कसे करायचे. वन विभागाच्या साहाय्याने आदिवासी बांधवांना रोजगाराच्या प्रगत संधी उपलब्ध करून देणाऱ्या प्रथम कौशल्य विकास केंद्र आणि नरनाळा इको टुरिजम संकुलाचे नाव आम्ही इथून पुढे विविध संभाषणात उदाहरण म्हणून अभिमानाने देऊ. वन परिक्षेत्र कार्यालय व शासकीय काष्ठ आगार, परतवाडा याची सविस्तर माहिती मिळाली. कोणत्याही एका विषयाचे तज्ञ व्हावे असा सल्ला श्रीमती. दिव्या भारती (DCF, Sipna) मॅडम यांनी दिला. वॉटरहोल आणि कुरण विकास व्यवस्थापनाने वन्यजीवांच्या संवर्धनात मोलाची भर घातलेली आहे हे आम्ही शिकलो. शेवटी निसर्ग निर्वाचन केंद्र, गुल्लरघाट संकुलाचा आस्वाद घेतला. निसर्ग संवर्धनात लोकांचे सहभाग वाढवून समाजाचा शाश्वत विकास करण्यासाठी आम्हाला मेळघाट परिचय व अभ्यास दौऱ्याचा पुरेपूर फायदा होईल एवढं मी खात्रीने सांगेन. या अभ्यास सहलीच्या आयोजनासाठी चंद्रमा अकादमी व मेळघाट येथील अधिकाऱ्यांचे खूप-खूप आभार!

**-शिवाजी नागनाथ टोम्पे**
प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी













# गणेशोत्सव

गणेशोत्सव म्हटला की, संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय. या उत्सवाच्या जल्लोषात आबालवृद्ध तल्लीन होऊन जातात. हा कोरोना महामारीनंतरचा मुक्त असा पहिला गणपती उत्सव होता. आम्ही परिविक्षाधीन वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांपैकी बऱ्याच जणांनी पुण्यात होणारा गणेशोत्सव अनुभवला होता. तोच विचार मनात ठेवून माझ्याबरोबरच चंद्रमाच्या पहिल्या RFO Batch च्या "Cultural and literally team" ने गणेशोत्सव अतिशय जोरदार उत्साहाने साजरा करायचा ठरवले.

नवीन शहर अन् नवीन माणसे यामुळे थोडी समस्या येणे साहजिकच. पण आमच्या मार्गदर्शक RFO चेतना म्हस्के मॅडम यांच्यामुळे हे सहज शक्य झालं. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण सांस्कृतिक कमिटी कामाला लागली. आमच्या टीमने प्रतिष्ठापना करण्यासाठी बाप्पांची सुरेख मूर्ती आणली. संपूर्ण नियोजनात सर्व प्रशिक्षणार्थी बॅचचे सहकार्य सोबत होतेच. सर्वांनी मिळून बाप्पासाठी सुरेख सजावट देखील केली होती. गणेश चतुर्थीच्या दिवशी मा. पत्की सरांच्या हस्ते प्रतिष्ठापना करण्यात आली आणि पाच दिवसाच्या गणेशोत्सवाची गोड सुरुवात झाली. रोज सकाळ - संध्याकाळी होणाऱ्या आरतीने वातावरण प्रसन्न होऊन जात होते. गणेश उत्सवादरम्यान स्पोर्ट्स कमिटीतर्फे चंद्रमा व्हॉलीबॉल लीग यशस्वीपणे आयोजित करण्यात आली.

बघता बघता ५ दिवस होऊन गेले आणि बाप्पांना निरोप देण्याचा दिवस उजाडला. त्यादिवशी छोटासा पण नियोजनपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आदित्य कुमारजी (Gangs of Wassepur या चित्रपटातील कलाकार), श्री. लोणकर सर, श्री. कुमार स्वामी सर, श्री. सुमित कुमार सर, श्री. पत्की सर, श्रीमती. पियुषा जगताप मॅडम, श्री. अविनाश कुमार सर, श्री. प्रशांत खाडे सर, श्री. बडेकर सर, श्रीमती. मनिषा भिंगे मॅडम, श्रीमती. शितल नांगरे मॅडम आणि आमच्या सांस्कृतिक कमिटीच्या मार्गदर्शिका श्रीमती. चेतना म्हस्के मॅडम उपस्थित होत्या. चंद्रमा व्हॉलीबॉल लीग स्पर्धेच्या विजेत्या आणि उपविजेत्या संघाना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमात अनेक प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळवली.

या कार्यक्रमाची सांगता झाल्यावर बाप्पांना निरोप देण्याची वेळ झाली होती. निरोप देताना स्पीकरवर सुरू झालेल्या गाण्यांवर सर्व प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी एकच ठेका धरला आणि वाजत गाजत, ''पुढच्या वर्षी लवकर या'' ही घोषणा देत गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप दिला.

**-स्नेहल शिवदत्त माटे**
प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी
(चंद्रमा सांस्कृतिक कमिटी)



# चंद्रमा व्हॉलीबॉल लीग

आपल्या जीवनात शिक्षणाइतकाच खेळही महत्त्वाचा आहे. परिक्षेत चांगले गुण मिळवण्याबरोबरच आपण निरोगी आणि तंदुरुस्त असणे महत्त्वाचे आहे. आमच्या प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी बॅचच्या खेळ समितीने गणपती उत्सवानिमित्ताने अकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांची चंद्रमा व्हॉलीबॉल लीग  आयोजित केली. या क्रीडासत्रामध्ये ६ संघ तयार केले व ६ संघात प्रत्येकी ८ खेळाडू आणि प्रत्येक संघात २ महिला खेळाडू असतील अशाप्रकारे त्यांची निवड यादृच्छिकपणे करण्यात आली. आम्ही या ६ संघांना महाराष्ट्रातील ६ राष्ट्रीय उद्यानांचे नावे दिली- १. संघ ताडोबा , २.संघ नवेगाव, ३. संघ बोरिवली, ४. संघ चांदोली, ५. संघ पेंच, ६. संघ गुगामल.

दि. १ सप्टेंबर, २०२२ ला अकादमीमधील वरिष्ठ अधिका-यांनी उद्घाटन केले. गणेश उत्सवाचा श्रीगणेशाचा पहिला सामना संघ ताडोबा विरुद्ध संघ नवेगाव यांच्यात झाला, यात संघ ताडोबा विजयी झाला. तर दुसरा सामना संघ बोरीवली विरुद्ध संघ गुगामल यांच्यात झाला, या सामन्यात संघ गुगामल विजयी झाला व त्याच दिवशी तिसरा सामना संघ पेंच विरुद्ध संघ चांदोली यांच्यात पार पडला, यात संघ पेंच विजयी झाला. सर्वाधिक फरकाने संघ गुगामल विजयी झाला म्हणून त्या संघाने अंतिम सामन्यात प्रवेश केला तर उर्वरीत  विजयी संघांचा (संघ पेंच विरुद्ध संघ ताडोबा) क्रीडासत्राच्या दुसऱ्या दिवशी सेमीफायनल सामना झाला, यात संघ पेंच विजयी झाला. तर क्रीडासत्राच्या तिसऱ्या दिवशी संघ पेंच विरुद्ध संघ गुगामल यांच्यात सामना झाला, यात संघ पेंच अंतिम सामन्याचा दावेदार ठरला.

या उत्साहवर्धक चंद्रमा व्हॉलीबॉल लीग मधील विजेता व उपविजेता संघांना गणपती उत्सवानिमित्ताने झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात मान्यवरांकडून चषक आणि पदक देऊन गौरवण्यात आले.

**-विकेश शामराव ठाकरे**
प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी (खेळ समिती, चंद्रमा)



# राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण
## National Tiger Conservation Authority

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम-**३८ एल** प्रमाणे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण गठित करण्याचे अधिकार केंद्र शासनास देण्यात आले आहे.

**व्याघ्र संवर्धन प्राधिकरण गठन**

**अध्यक्ष–** केंद्रीय मंत्री – वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय

**अपाध्यक्ष–** राज्य मंत्री – वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय

**सदस्य –**

१. लोकसभा सदस्य (एकूण ३)
२. वन्यजीव संवर्धन आणि व्याघ्र संरक्षित क्षेत्रातील लोकांचे कल्याणाकरिता आवश्यक अनुभव व विशिष्ट अर्हता प्राप्त तज्ञ (एकूण ८)
३. सचिव – वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय
४. महानिदेशक वने आणि विशेष सचिव, वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय
५. संचालक, वन्यजीव संरक्षक, वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय
६. मुख्य वन्यजीव रक्षक, व्याघ्र संरक्षित क्षेत्र असलेल्या राज्यातील (एकूण ६)
७. सहसचिव पदापेक्षा कमी नसलेला विधी व न्याय मंत्रालयातील अधिकारी
८. सचिव – आदिवासी विकास मंत्रालय
९. सचिव – सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय
१०. अध्यक्ष – राष्ट्रीय अनुसूचीत जमाती आयोग
११. अध्यक्ष – राष्ट्रीय अनुसूचीत जाती आयोग
१२. सचिव – पंचायत राज मंत्रालय

**सदस्य सचिव** – महानिरीक्षक वने किंवा समकक्ष अधिकारी ज्याला व्याघ्र राखीव क्षेत्र किंवा वन्यजीव व्यवस्थापनामध्ये किमान १० वर्षाचा अनुभव असेल.

व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये-वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम **३८-ओ**

**व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये**

१. राज्य शासनाच्या **व्याघ्र संवर्धन आराखड्यास** मंजूरी देणे. **(कलम ३८ व्ही चे उपकलम ३)**
२. पर्यावरण सुरक्षेच्या दृष्टीने विविध पैलूचे मूल्यांकन व योग्यता तपासणे. व्याघ्र राखीव क्षेत्रात खाण, उद्योग आणि इतर प्रकल्पाच्या पर्यावरणीय असुरक्षित जमीन वापर पद्धती अमान्य करणे.
३. पर्यटनाकरीता मानके निश्चित करणे आणि व्याघ्र राखीव क्षेत्रातील गाभा क्षेत्र (Core) व बफर क्षेत्रातील वाघ संवर्धनाकरीता वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी करणे.
४. राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य किंवा व्याघ्र राखीव क्षेत्राचे बाहेरील मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या उपाययोजना कार्य आयोजन संहितेमध्ये समाविष्ट होतील यावर भर देण्यात येईल.
५. संरक्षणाचे उपाय, भविष्यातील संवर्धन योजनासह, वाघ व त्याच्या नैसर्गिक भक्ष्याची अंदाजित संख्या, अधिवासाची स्थिती, रोगांवरील नियंत्रण, जीवीतहानी सर्वेक्षण, गस्त, दुर्घटना आदि असे इतर व्यवस्थापकीय पैलू जे भविष्यातील संवर्धन योजनेकरीता महत्वाचे ठरतील, याची माहिती पुरविणे.
६. वाघ, सहमांसभक्षी, भक्ष्य, अधिवास, संबंधित पर्यावरणीय व सामाजिक-आर्थिक मापदंड आणि त्याचे मूल्यांकन, संशोधन आणि देखरेख याचा समन्वय करणे व मान्यता देणे.
७. व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे सल्ल्याने व राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांचे मान्यतेशिवाय लोकहितास्तव, दोन व्याघ्र राखीव क्षेत्र किंवा दोन संरक्षित क्षेत्रास एकमेकास जोडणारे क्षेत्र पर्यावरणीय असुरक्षित वापराकरीता वळविले जाणार नाही याची सुनिश्चिती करेल.
८. लोक सहभाग व परिस्थितिकी सुधार योजनांच्या माध्यमातून मंजूर व्यवस्थापन आराखड्यानुसार जैवविविधता संवर्धन करण्यास व्याघ्र राखीव क्षेत्र व्यवस्थापनास समर्थन व मदत करेल.
९. व्याघ्र संवर्धन योजनेची योग्य अंमलबजावणी करण्यास शास्त्रोक्त, माहिती तंत्रज्ञान व कायदेशीर बाबीचे पाठबळ मिळण्याची सुनिश्चिती करेल.
१०. व्याघ्र राखीव क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकास क्षमता बांधणी करण्यास मदत करेल.
११. वाघ व त्याचे अधिवास संवर्धन संबंधित जी कृती, सदर कायद्यातील हेतू साध्य करण्यास आवश्यक ठरेल ती कृती करेल.

अधिवास = Habitat, व्याघ्र राखीव क्षेत्र = Tiger Reserve, व्याघ्र संवर्धन आराखडा = Tiger Conservation Plan

**– संजय म. जगताप**
निवृत्त वन अधिकारी

# जैवशाही जिंदाबाद!

कदाचित ती सकाळ सामान्य नसावी. धुक्याची कापसासारखी झालर सर्व आसमंतात पसरली होती. शक्यता अशीही होती की, सूर्य अजून निद्रावस्थेत होता. बहुधा त्यालाही थंडी भरली असावी. आम्ही म्हणजेच नव्याने वनांची काळजी घेण्यास सज्ज होऊ पाहणारे नव-वनप्रशिक्षणार्थी, मेळघाटच्या घनदाट व अगम्य अशा जंगलाची सखोल माहिती असणाऱ्या अवलियासोबत (वानखडे साहेब) 'निसर्ग वाचनास' निघालो. आम्हाला तो अनुभव लहान मुलाने पहिल्यांदाच कोऱ्या पाटीवर 'अ ब क ड.....' लिहावा इतका नवीन होता.

आम्ही मेळघाटच्या जंगलाच्या वाटा तुडवण्यास सुरुवात केली असता, जंगलातील सर्व प्राणी पक्षी सतर्क झाले. माकडांनी आमच्याकडे बघून दात दाखविण्यास सुरुवात केली; पक्षी आपापसात कुजबुजू लागले; त्यांना झाडेही सळसळून आवाज देऊ लागली. त्यांच्या घरामध्ये म्हणजेच मेळघाटच्या त्या जंगलात त्यांना आम्ही शत्रू, मित्र वा पाहुणे यापैकी कोण आहोत? याबाबत धाकधूक वाटू लागली.

आम्ही आल्याची वर्दी घेऊन 'कोतवाल पक्षी' जंगलाच्या राजाच्या दरबाराकडे म्हणजेच 'कुलामामाच्या' (कोरकुंच्या भाषेत वाघ म्हणजेच कुलामामा/बडे) दरबाराकडे वर्दी घेऊन निघाला. कोतवाल इतक्या घाईत आल्याचे पाहून दरबारात एकच झुंबड उडाली. प्रत्येक प्राणी आपला कयास लावू लागला; कारण माणूस जंगलात म्हणजेच त्यांच्या घरात आला की, त्यांना संकटाचा सामना करावा लागतो की काय हा प्रश्न कायमच त्यांना पडत आलाय. हे सर्व सुरू असताना 'बाणा' (कोरकुंच्या भाषेत अस्वल म्हणजेच बाणा) अत्यंत संतप्त झाला. झाडांच्या बुंध्यांवर त्याची नखे तासू लागला. 'दुर्मिळ जंगली घुबड' त्याच्या घराच्या सुरक्षेच्या चिंतेने चिंताग्रस्त झाले. जंगली कुत्र्यांनी जंगलाच्या सर्व पहारेक-यांना सतर्क केले.

'छोटे' (कोरकुंच्या भाषेत वाघाचा बछडा म्हणजेच छोटे) तिकडून उडालेला गोंधळ पाहतच होता. लहान मुलांच्या स्वभावाप्रमाणे 'छोटेची' या घटनेबाबत माहिती मिळवण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली. त्याने आपल्या 'कुलाबाबाला' (वाघ) विचारले की महाराज हा मनुष्य प्राणी नवीन आहे काय? त्यावेळी वाघ उत्तरला, माणूस आपल्यासारखाच या पृथ्वीतलावरील एक जैवप्रजाती आहे. जसे आपले नाव *'Panthera tigris'* आहे तसेच त्याचे नाव *'Homo sapien sapiens'* आहे. तो या पृथ्वीवरील सर्वाधिक उत्क्रांत झालेला प्राणी आहे. त्यामुळे त्याने सर्व जैवप्रजातींना त्याच्या गरजेप्रमाणे वापरून घेतले आहे. कधी त्याने खेळासाठी, मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी आणि न संपणाऱ्या हव्यासासाठी पृथ्वीवरील इतर जैवप्रजातींचा अत्याधिक वापर करून घेतला आहे. तथापि त्याने आपल्यासाठी वन विभाग निर्माण केला आहे. जो आपली काळजी घेत आहे आणि आपले समाजकंटकांपासून संरक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे. आपल्यासाठी त्याने वनसंरक्षण कायदा केला आहे. त्याने झाडे कापण्यास प्रतिबंध लावला आहे. या बाबी सर्व दरबार निमुटपणे परंतु संतप्त मनाने ऐकत होता.

तेवढ्यात वाघ महाराजांच्या शब्दांनी संतप्त झालेला सुवर्ण कांती व त्यावर ठिपक्यांची छटा असणारा 'बिबट्या' गुरगुरू लागला. तो म्हणू लागला, ''मला पुरेसे जंगलघर उरलं नाही. माझ्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होतो. मला पाण्याच्या शोधार्थ मनुष्यप्राण्याच्या वस्तीतही जावे लागते. पण मला हा मनुष्य प्राणी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करतो. तसेच म्हणतो की, या बिबट्याने आमच्या घरात अतिक्रमण केले. परंतु तो हे विसरतो की त्याने आपल्या सर्व वन जैवप्रजातींच्या घरामध्ये आक्रमण केले आहे. कुलामहाराज, वनसंरक्षण कायद्याची कसली भाषा करता? मनुष्य प्राण्याने त्याचं राज्य उभं केलं त्याला तो लोकशाही म्हणतो. त्या लोकशाहीत आपण खिजगणतीतही नाही. तो फक्त आपल्या स्वार्थाचाच विचार करून कायदे बनवत आहे. त्यांच्या प्रतिनिधीगृहात ना आपला प्रतिनिधी आहे ना आपलं कोणी ऐकून घेत आहे. कुलामहाराज हीच ती वेळ आहे आपल्याला आता क्रांती करायला हवी. या मनुष्यप्राण्याला आपण धडा शिकवलाच पाहिजे. आपण आपली नवी व्यवस्था उभी करू ज्यात आपलं ऐकून घेतले जाईल. आपण समृद्ध अशा 'जैवशाहीची' स्थापना करू. त्यामुळे सर्व प्राण्यांनी माझ्या मागून म्हणावे, जैवशाही जिंदाबाद! जैवशाही जिंदाबाद! जैवशाही जिंदाबाद!''

बिबट्याचा हा सात्विक संताप ऐकून व त्याने केलेली बंडाची भाषा ऐकून कुलामहाराजांना चिंता वाटू लागली. 'बंड' म्हणजे 'हिंसा'; आणि 'एकतर्फी हिंसा' हा काही वन्यप्राण्यांचा गुणधर्म नव्हे. कुलामहाराज समजुतीच्या सुरात उत्तरले की, मनुष्यप्राणी हा आपला दुष्मन किंवा भक्ष्य नव्हे. तोही आपल्यासारखाच जैवविविधतेचा हिस्सा आहे. त्याने निर्माण केलेला वन विभाग आपली काळजी घेत आहे. आपण काही अराजकतावादी नाही. आपण निसर्गाच्या ठरवून दिलेल्या 'जगा आणि जगू द्या' या नियमांचे पालन करतो. आपण त्यांना एक संधी देण्यास काही हरकत नसावी. कुलामहाराजांच्या या शब्दांनी सर्व दरबार शांत झाला.

कुलामहाराजांनी कोतवालास बोलवले व सर्व वन्यप्राण्यांच्या वतीने मनुष्यप्राण्याला संदेश देण्यास सांगितले. त्या संदेशानुसार मनुष्यप्राण्यांनी वन्यप्राण्यांच्या घरामध्ये अतिक्रमण करू नये; वन्यप्राण्यांच्या जीवाला हानी पोहोचेल अशा बाबींवर नियंत्रण ठेवावे; वन्यप्राण्यांचे जंगलघर वेगवेगळ्या हव्यासासाठी जाळलं जातं त्यावर नियंत्रण आणावे; जो मनुष्यप्राणी वन्यप्राण्यांना हानी पोहोचवेल त्यावर जरब बसवावी; वन्यप्राण्यांच्या घरातील सदस्य असणाऱ्या झाडांच्या अवैध कत्तली केल्या जातात त्यावर बंधने आणावीत; वन्यप्राण्यांच्या जंगलघर सुरक्षित करावं बाकी आमची काहीही अपेक्षा नाही. त्याबरोबरच आमच्या वन विभागाच्या वनांच्या आचारसंहितेचे पालन करावे तसेच आमच्या जैवशाहीच्या तत्त्वाचा मनुष्यप्राण्याने आदर करावा, अशी आमच्या सर्व वन्यप्राण्यांची इच्छा आहे.

एवढे बोलून कुलामहाराजांनी कोतवालास एक पांढरे वन्यफुल देऊन हा संदेश आमच्यापर्यंत म्हणजेच वन प्रशिक्षणार्थींपर्यंत पोहोचवण्यास सांगितले. आमच्यासोबत असणाऱ्या ज्ञानी मार्गदर्शकाने कोतवालाचा तो संदेश आम्हाला जशाच्या तसा सांगितला. जंगल, जंगलातील प्राणी, पक्षी, झाड, फुल, फळ इ. च्या संवर्धनाची शपथ आमच्याकडून घेतली. कदाचित तो दिवस ऐतिहासिक असावा, कारण लोकशाहीत जगणाऱ्या आमच्यासारख्या अज्ञानी जगताला जैवशाहीचा सुगंध लागला होता. तो सुवास सर्व पृथ्वीतलावर पसरावा हीच या वन्यजीव सप्ताहाची फलनिष्पत्ती असावी.

जैवशाही जिंदाबाद!

जैवशाही जिंदाबाद!

जैवशाही जिंदाबाद!

**-निखिल व्यंकटराव पाटील**
प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी





# अभियंत्यांना वनसंवर्धनाकडे आकर्षित करणे - एक अनुभव

चंद्रमाने सरळसेवा भरती वनक्षेत्रपाल यांना दीड वर्षाचे वानिकी प्रशिक्षण देण्याचे आव्हानात्मक कार्य स्वीकारुन, ४८ तरुण व तरुणींना ऑगस्ट,२०२२ चे मध्यापासून प्रशिक्षण देण्याचा यज्ञ सुरू केला. यज्ञज्योत प्रज्वलीत तर झाली, परंतु त्यास सतत ज्ञानसमिधा पुरविण्यासाठी पुरोहित निवडीचे कठीण आव्हान चंद्रमासमोर होते. ४८ पैकी ४० प्रशिक्षणार्थी अभियंता पदवीधर आहेत. सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ,महाराष्ट्र यांनी चंद्रमाला या पुण्यवान संधीचा लाभ घेण्यासाठी पुरेपूर सहकार्य करण्याचे ठरविले, त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही वनप्रबोधिनी महाराष्ट्रात असून,राज्याच्या वन व्यवस्थापनातील अग्रगण्य संस्था म्हणून राष्ट्रात नावारुपास यावी अशी प्रांजल सदिच्छा आहे.

सेवक संस्थेतील पुढील सदस्यांनी शिक्षण देण्यासाठी स्वेच्छा दर्शविली. श्री. संजय जगताप, श्री. राजेंद्र धोंगडे, श्री. संजय धर्माधिकारी, श्री. रामचंद्र गिरी, श्री. निरंजन विवरेकर, श्री. प्रदीप कुलकर्णी, श्री. सुभाष बडवे आणि मी सुध्दा.

ओपनिंग फलंदाज म्हणून मी आणि श्री. संजय जगताप मैदानात उतरलो; कारण पूर्वीचा अनुभव, आवड आणि आकर्षण. मी, वनसंवर्धन-१ हा विषय निवडला; कारण हाच विषय मी कुंडल वनप्रबोधिनीतील प्रथम तुकडीतील सरळसेवा भरती वनक्षेत्रपालांना शिकविला होता आणि माझेकडे त्याची अभ्यास टिप्पणे तयार होती. नवीन सुमारे २५० पी.पी.टी. तयार करुन व वनसेवेतील विविध अनुभवाचे जोरावर मी या विषयाचे ज्ञान प्रशिक्षणार्थींच्या बुध्दीत संचलीत करणे म्हणा किंवा गळ्यात घंटा बांधणे म्हणा उतरविण्याचा प्रयत्न केला. माझे प्रशिक्षणाची महती हे वनक्षेत्रपाल वनसेवेत गेल्यानंतर रोपवाटीका, रोपवने व वनसंवर्धनाची कामे कशी पार पाडतील याचेवरून मोजता येईल.

रोज तीन तास, दोन सत्रात शिकविणे सोपे काम नव्हते, विशेषत: दोन वर्षापूर्वी मला झालेल्या कोवीडमुळे,माझी श्वसनप्रणाली अकार्यक्षम झाल्याने,माझा बुलंद आवाज क्षीण झाला होता. तरीही शक्य होईल तेवढ्या मोठ्या आवाजात मी ज्ञानदानाचा प्रामाणिक प्रयत्न करीत होतो व त्यास माझे विद्यार्थी, माझे ८० वर्षाचे बालवय बघून छान प्रतिसाद देत होते. काही विद्यार्थी माझे क्षीण आवाजावर खूष होते; कारण त्यांचे झोपेत कमी बाधा येत होती. म्हणून मी माझे शिक्षणाचे पध्दतीत थोडासा बदल करुन, विद्यार्थ्यांचे छोटे गट पाडून, त्यांना चर्चा व सादरीकरण करण्यासाठी प्रवृत्त करीत होतो. या बदलामुळे अनेक मुके विद्यार्थी बोलके झाले, झोपणारे जागृत झाले आणि सर्वांचे अंगात उत्साह व स्फुरण चढले. सामुहिक काम करण्याची चेतना निर्माण झाली. शेवटी, मी त्यांचेकडून जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून घेऊन, त्यांना परीक्षेला सामोरे जाण्यासाठी बलवान केले. अनेक वेळा मार्मिक विनोद, शालीतील शब्द वापरुन त्यांना कार्यक्षम ठेवण्यासाठी मी प्रयत्नशील होतो.

त्यांचे शारीरीक शिक्षणाचे वेळी सकाळी मी माझ्या सकाळच्या पदभ्रमणाने त्यांना अप्रत्यक्षरित्या वेळ, शिस्त व सातत्य यांची जाणीव करुन देत असे. सायंकाळी ५ ते ६ वाजता त्यांचे व्हॉलीबॉल खेळास प्रोत्साहन देण्यासाठी मी नित्यनेमाने हजर रहात असे. त्यांना ब्रिज हा ५२ पत्त्यांचा खेळ शिकविण्याचा अयशस्वी प्रयत्न पण मी केला.३० सप्टेंबर२०२२ रोजी वनसंवर्धन-१ विषयाचा कोर्स पूर्ण केला. त्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी भावनिक निरोप सोहळ्याचा छोटा कार्यक्रम आयोजीत करुन माझे कार्याची पावती मला दिली.

मला यासाठी प्रबोधनीचे संचालक श्री.महिप गुप्ता, उपसंचालक पियुषा जगताप, श्री. अविनाशकुमार, श्री महेश पानसे व सर्वांचे आभार मानलेच पाहीजेत. आता संचालक पदाची सूत्रे श्री. श्रीनिवास रेड्डी यांनी स्वीकारली आहेत. त्यांना आणि सर्व चंद्रमा चमूस माझ्या शुभेच्छा! सर्व ४८ प्रशिक्षणार्थींना यश लाभो ही प्रार्थना.

**- व्हि. टी. पत्की**
सेवानिवृत्त वनाधिकारी

## वन्यजीवांची तस्करी

*अंधश्रध्दा माणसाची*
*घेऊन कुठे चालली...*
*वन्यजीवांची तस्करी...*
*मोकळेपणाने थाटली...*
*जादुटोणा काळीजादू...*
*माणसाची गोड संभ्रमे....*
*निष्पाप जीवांचा संबंध...*
*दूरदूर पर्यंत कुठे!!!*
*शिकार कातडीसाठी*
*कधी मांसासाठी क्रूर...*
*अटकेतील जीवांचा...*
*कोलाहल मात्र व्याकूळ ...*
*पैशाचा पाऊस कसा?*
*आर्थिक सुबत्ता कशाची?*
*वन्यजीवांच्या हत्येचा*
*गुन्हा मात्र सोबती !!!*

**- प्रथमेश हडपे**
सहाय्यक वनसंरक्षक, यावल

# पाहुण्यांचे आगमन (चित्ता)

नामिबिया तसा भारतातील सामान्य नागरिकांना माहीत नसलेला आफ्रिका खंडातील एक देश. पण अचानक नामिबिया देश सर्व भारतीयांना परिचित झाला यास कारणही तसेच आहे. नामिबियामधून भारतात येणाऱ्या नवीन पाहुण्यांचे तब्बल स्वातंत्र्याच्या सात दशकानंतर १७ सप्टेंबर रोजी मा. पंतप्रधानांच्या उपस्थितीत भारतीय भूमित आगमन झाले. हे पाहुणे दुसरे-तिसरे कोणी नाहीत तर ''आफ्रिकन चित्ते'' *(Acinonyx jubatus jubatus)* आहेत.

चित्ता तसा भारतीय भूमिला नवीन नाही. भारतात आशियाई चित्त्याचा *(Acinonyx jubatus venaticus)* अधिवास मध्यभारतातील जवळपास संपूर्ण प्रदेशात होता. पण राजा-महाराजांच्या काळात व ब्रिटीश साम्राज्यात शिकार आणि अधिवास नष्ट होण्याच्या चक्रात चित्त्यांची संख्या रोडावली आणि भारतीय स्वातंत्र्य वर्ष १९४७ साली शेवटच्या चित्त्याची शिकार देखील झाली अन् १९५२ साली अधिकृतपणे चित्ता भारतीय भूमीतून नष्ट झाल्याचे जाहीर करण्यात आले.

मग सुरू झाला जगातील सर्वात वेगवान प्राण्याचा भारतीय भूमीत पुनःप्रवेशाचा प्रवास. चित्ता प्रवेशासाठी २००९ पासून वाईल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया (WTI) आणि वाइल्ड लाईफ इन्स्टिट्युट ऑफ इंडिया (WII) तर्फे विशेष प्रयत्न सुरू झाले. यासाठी विशेष तज्ञ समितीमार्फत देशातील विविध १० ठिकाणांचा अभ्यास करण्यात आला आणि त्यातून मध्यप्रदेशातील कूनो-पालनपुर राष्ट्रीय उद्यानाची चित्त्यांच्या अधिवासासाठी सुयोग्य ठिकाण म्हणून निवड करण्यात आली. संबंधित उद्यान ७४८ चौरस किलोमीटर क्षेत्रावर पसरलेले शुष्क पानझडी प्रकारातील प्रदेश आहे. कूनो राष्ट्रीय उद्यानात असणारा गवताळ प्रदेश चित्त्यांसाठी पोषक आहे शिवाय तिथे आढळणारे चितळ *(Axis axis)*, सांबर *(Rusa unicolor)*, नीलगाय *(Boselaphus tragocamelus)*, रानडुक्कर *(Sus scrofa)*, चिंकारा *(Gazella bennettii)*, चौशिंगा *(Tetracerus quadricornis)*, काळवीट *(Antilope cervicapra)* सारखे तृणभक्षक प्राणी चित्ता प्राण्यासाठी खाद्य म्हणून उपलब्ध आहेत. कूनो राष्ट्रीय उद्यानाची यापूर्वी गीर राष्ट्रीय उद्यानातील आशियाई सिंहाच्या स्थलांतरासाठी निवड करण्यात आली होती. परंतु काळाच्या ओघात आशियाई सिंहांचे स्थलांतर मा. सुप्रीम कोर्टाच्या परवानगीनंतर बारगळले. पण आता तेच राष्ट्रीय उद्यान नामिबियातून आणण्यात आलेल्या ८ आफ्रिकन चित्त्यांचे आवास बनले आहे. नामिबियातून भारतात आलेल्या ८ आफ्रिकन चित्त्यांमध्ये ५ मादी चित्ते, तर ३ नर चित्त्यांचा समावेश आहे. सदैव मानव-प्राणी संघर्षात भरडला जाणारा बिबट्या हा चित्ता या प्राण्यांशी साम्य राखून असतो. दोन्ही प्राणी एकाच कुळातील *(Family-Felidae)* आहेत. परंतु दोघांमध्ये काही मूलभूत फरक आहे. चित्त्याला ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे अंगावरचे ठिपके. ठिपक्यांमुळे बिबट्या आणि चित्त्यामध्ये लोक नेहमी गफलत करतात. चित्त्याच्या अंगावरचे ठिपके भरीव असतात तर बिबट्याचे ठिपके आतून पोकळ असतात. चित्त्यांच्या डोळ्याखाली अश्रूंसारख्या ओघळणाऱ्या काळ्या रेषा असतात. बिबट्यांची शरीरयष्टी ही भरभक्कम मांजरांसारखी गुबगुबीत असते, तर चित्त्याची कुत्र्याप्रमाणे लांबसडक जोरात पळण्यास सक्षम असते. चित्त्याची छाती ही खोलवर व कंबर अतिशय बारीक असते. पाय अतिशय लांब सडक व लवचिक असतात. त्यामुळे चित्ता वेगाने पळू शकतो. शिवाय चित्ता दिवसा शिकार करतो तर बिबट्या रात्री शिकार करण्यास प्राधान्य देतो. शिवाय बिबटे झाडावर चढण्यात चित्त्यापेक्षा जास्त तरबेज असतात.

आज भारत मांजर कुळातील चार महत्त्वाच्या प्रजाती असलेल्या वाघ, आशियाई सिंह, चित्ता आणि बिबट्या या चारही प्राण्यांचा अधिवास असणारे कदाचित एकमेव ठिकाण असेल. आज पाहुणे म्हणून आलेले चित्ते लवकरच भारतीय वन्यप्राणी कुटुंबाचे कायमचे सदस्य होतील. या पाहुण्यांचे संरक्षण आणि संवर्धन एखाद्या राजकुमाराप्रमाणे होईल यात शंका नाही आणि लवकरच देशाच्या सामान्य नागरिकाला देखील चित्त्यांचा वेग अनुभवायला मिळेल याची खात्री वाटते.

**-सूरज माणिक आवारे**
प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी



# सातपुडा टायगर रिझर्व्ह मधील एक थरारक दिवस



सुनीलला काही कामानिमित्त सातपुडा टायगर रिझर्व्ह(मध्य प्रदेश)ला जायचं होतं. मला हिंडायची भारी हौस, मग त्याला म्हणलं, ''मी पण येते'', आणि आम्ही शुक्रवारी सकाळी नागपूरातून निघून बैतुलमार्गे होशंगाबाद जिल्ह्यातील मढई गावी आलो. गाडीतून उतरलो तर समोर तवा डॅमचे पसरलेले पाणी, वरून ओतणारा पाऊस, प्रचंड वारा... एकूणच वातावरण मस्त होतं. गाड्या नदीच्या ह्या बाजूला लावून आम्ही बोटीतून पलीकडे आलो. समोर वनविभागाचे अतिशय सुंदर रेस्टहाऊस! रात्री जेवण आटोपून झोपलो. रात्रभर प्रचंड पाऊस पडत होता. सकाळी सफारी करून गवे, हरणं, सांबर बघून रेस्टहाऊस ला परतलो. दुपारनंतर आम्ही 'चूरणा' ह्या ठिकाणी जाणार होतो. जंगलातून रस्ता होता. पाऊस काय थांबत नव्हता म्हणून मी सुनीलला म्हणाले, either इथेच थांबू किंवा नागपूरला परत जाऊ... पण बायकोचे ऐकेल तो नवरा कसला! त्यातून तिथले जे APCCF आले होते 'मूर्ती' त्यांचे नाव! ते अजून एक पायरी वर... त्यांनी एक गाडी जंगलात पाठवली, आम्ही जाऊ शकतो का ते बघायला... फॉरेस्टच्या लोकांना एकच माहिती, साहेबाला जर एखाद्या ठिकाणी जायचं असेल तर मग वाटेल ते करून न्यायचंच! जिप्सीला कव्हर केलं, अजून गाडी घेऊन, सामान टाकून आम्ही निघालो.

रस्ता पूर्णपणे जंगलातला, त्यामुळे काही ठिकाणी दगडं, काही ठिकाणी माती. ड्राइवर चालवतोय, दणादण गिअर टाकत, फोरव्हील लावत... एके ठिकाणी गाडी चढेना. खूपच चिखल! दोन वेळा गाडी उलटी आली. पण हरेल तो ड्राइवर कसला! पूर्ण चिखल उडवत चढवली गाडी (बरं तर बरं मूर्तींनी काच चढवली होती) आता समोर आला मोठा ओढा. पाणी जोरात होतं. मूर्तींनी ड्रायव्हरला विचारलं 'क्यो जायेगी ना गाडी?' 'हा सर' 'सम्हालके हा बेटा' 'येस सर' हा दोघांत संवाद होत असताना मी 'आई जगदंबे वाचव ग!' (माझा धावा सुरू). गाडी पाण्यातून पुढे गेली तर मोठा चढ! हाण गाडी, समोर चिखल... लाव फोरव्हील... मोठी दगडं आली, ने दणकून त्यावरून... परत समोर ओढा... परत तेच संवाद आणि परत माझा मनातल्या मनात धावा... असेच ५-६ ओढे पार करत आम्ही एका protection कुटीला पोचलो. गाडी थांबली म्हणून मी पण जरा पाय मोकळे करावेत म्हणून उतरले तर तिथला वनरक्षक म्हणाला, सर पुढे जाता येणार नाही. ओढ्याला कमरेइतके पाणी आहे. माझा पुतळाच झाला कारण आम्ही सव्वा तास प्रवास करून आलो होतो त्यात ५.४५ झाले होते. म्हणजे थोड्याच वेळात अंधार होणार आणि मग तर जंगलातून, तेही या पावसात जाणे अजून अवघड होणार... पण मूर्ती साहेब काय मानायला तयार नव्हते. त्यांनी एक गाडी पाठवून दिली, नक्की पाणी किती आहे बघायला... ड्राइवर सांगत आला की गाडीची चाके बुडतील इतके पाणी आहे. आता काय? आता मूर्ती स्वतः निघाले पाण्याचे परीक्षण करायला. तोपर्यंत बाकीच्यांनी ठरवून बोट बोलावली जी आम्हाला परत रेस्टहाऊस ला नेईल. मूर्तीसाहेब आले, 'पानी तो कम हुवा है, थोडे रुक जायेंगे तो और कम हो जायेग और फिर निकल जायेंगे...' आता मी जरा वैतागलेच. सुनीलला बाजूला घेऊन म्हणलं, 'अरे पाऊस थांबणं आपल्या हातात आहे का? पाणी नाही उतरलं तर?' त्याच वेळी बाकी स्टाफ मूर्तींना हेच सांगत होता, 'मग ठरलं मागे जायचं बोटीने.'

बोटीच्या धक्क्यापर्यंत आम्हाला गाडीने जायचे होते, निघालो... धक्का साधारण १० मिनिटांच्या अंतरावर असताना गाडी एकदम ड्रायव्हरच्या बाजूने कलंडली. ड्राइवर गियर टाकतोय, फोर व्हील लावतोय गाडी हलायलाच तयार नाही. मग आम्ही गाडीच्या बाहेर येऊन बघतोय तर काय! गाडी ड्रायव्हरच्या बाजूनं दरवाज्यापर्यंत चिखलात रुतली होती. तोपर्यंत मागून जिप्सी आली आम्ही त्यात बसलो निघालो. आता धक्का साधारण ५ मिनिटांवर होता आणि समोर पूर्ण चिखल. हीही गाडी चिखलात फसू नये म्हणून उतरून सामान घेऊन चालत धक्क्यापर्यंत आलो. आता हा नेहमीचा धक्का नसल्याने एक बोट आम्हाला घ्यायला येत होती आणि एक बोट तो प्लास्टिकचा धक्का घेऊन येत होती. पहिली बोट आधी आली, आता कोणाचीही थांबायची तयारी नसल्यामुळे स्टाफमधील एकाने त्याच बोटीतली दोन फळकूट काढून चिखलात टाकली. आम्ही जिथे उभे होतो तिथून बोटीपर्यंत कमरेइतके उंच गवत होते. मला अशा गवतात साप असतील अशी भीती वाटते. त्यातून ह्या जंगलात अस्वलं आहेत. बापरे! अंधारात एखादं अस्वल समोर आलं तर! पण आता मनात काही न आणता मला बोटीपर्यंत जायचे होते. भरभर चालत, सर्कस करत एकदाचे बोटीत बसलो आणि बोट निघाली. मूर्ती म्हणाले, साधारण २० मिनिटात पोहचू आपण. शांतपणे आई अंबाबाईचे नाव घेत बाजूचे डोंगर बघत निघालो, पण दणकून पाऊस सुरू झाला. पावसात किनाऱ्यावरची लाकडे पाण्यात वाहात येत होती. बोट कासवाच्या गतीने जात होती. पावसामुळे आम्ही पूर्ण भिजलो होतो आणि अचानक इंजिन मधून आवाज येऊ लागला आणि बोट थांबली. एक लाकूड अडकले होते. प्रचंड पाऊस, पाण्यात मध्यभागी आमची बोट थांबलेली आणि सगळीकडे अंधार. आता? लगेच मूर्ती वदले, 'don't worry हम दुसरी बोट बुलायेंगे (लेकीन life jacket पहेन रहीये हा!)' आता आपलं मन गप्प बसतं का? सुरू विचार... वाऱ्याने बोट कलंडली तर?, पोहता तर येतंय पण दिशा कळली नाही तर, 'त्याक्षणी चिडता पण येईना... एकच गोष्ट करू शकत होते तीच करायला सुरुवात केली, आई अंबाबाईचा धावा' तोपर्यंत एकाने पाण्यात वाकून ते लाकूड काढले आणि बोट परत सुरू झाली, हुश्श! भिजल्यामुळे मी अक्षरशः काकडत होते. हळूहळू आम्ही रेस्टहाऊसपाशी आलो, उतरलो... पाय धक्क्याला लागले तेंव्हा बरं तर वाटलंच पण एकीकडे तिथेच राहिलेल्या दोन्ही ड्रायव्हरचा विचार मनात आला, काय करतील ती लोकं... पण मूर्ती म्हणाले ती दोघे protection कुटीला जाऊन थांबलेत. कपडे बदलून मस्त चहा घेताना मनात विचार आला आपण किती रिस्क घेतली होती? पण सुनील बरोबर होता त्यामुळे चिंता नव्हती. रात्री जेवताना दुसऱ्या दिवशी एका गावात जायचे ठरू लागले, पण आता मूर्तीसाहेबही घाबरले होते, पाऊस थांबला तरच जाऊ म्हणाले, 'निसर्गाशी नाही खेळायचे. आपण त्याची मर्जी बघायची असते तो नाही बघणार.' पण एकंदरीत कालचा दिवस संस्मरणीय झाला.

**– रोहिणी सुनील लिमये**

लेखिका या सेवानिवृत्त प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांच्या पत्नी आहेत.

# कापूसकोंड्याची गोष्ट ...

लहानपणीची एक गोष्ट, जेवढी ऐकली त्यापेक्षा जास्त वेळा सांगितली गेलेली. गोष्टीला ना आगा ना पिछा, ना काही स्टोरी आणि त्याकाळी व्हॉट्स ॲप नसतानाही सगळ्यांना माहीत असणारी गोष्ट. बाकी गोष्टीत कापूसकोंडा म्हणजे कोण किंवा काय हे मात्र शेवटपर्यंत काही कळलं नाही. असो, आज मी पण एक कापूसकोंड्याची गोष्ट सांगणार आहे.

काही महिन्यांपूर्वी उन्हाळ्याच्या दिवसात असंच संध्याकाळी फिरताना पांढऱ्या काटेसावरीच्या बऱ्याचशा शेंगा सापडल्या व मी त्या घरी आणल्या होत्या. त्या वाळल्यावर प्राचीने त्यातल्या कापसाची छान छोटीशी आणि मऊमऊ उशी बनवली. त्यावेळी एक शेंग अर्धवट उघडून मी गच्चीत रेलींगला बांधून ठेवली, चिमण्यांसाठी.

विणीचा हंगाम सुरु होत होता व चिमण्यांना ही ती शेंग लगेच सापडली. मग काय! चोची भरभरून कापूस नेणे सुरू झाले. हा कापूसही अगदी मुलायम, नाजूक जरा शेंगेबाहेर पडला की उडालाच वाऱ्यावर. इवल्याशा चोचीत तो पकडण्यासाठी चिमणीचे चाललेले प्रयत्न, चोचीत, पायात अडकलेले तंतू काढण्यासाठी चाललेला खटाटोप आणि परत परत कापूस नेण्यासाठी मारल्या जाणाऱ्या चकरा. सगळंच बघायला मस्त वाटत होतं. मग अजून शेंगेतला थोडा कापूस एका जाळीच्या पिशवीत ठेऊन पिशवी कडीपत्त्याच्या झाडाला बांधली.

चिमणीचे काय कमी होती, चष्मेवाला (white eye) या पिवळ्या गोंडस पक्ष्यालाही या कापसाचा सुगावा लागला. झालं त्याच्याही गच्चीवर फेऱ्या सुरू झाल्या. चिमणी सारखा सराईत नसल्याने हा मात्र गच्चीवर भीतभीतच येई व पटकन निघूनही जाई.


एकदोनदा ग्रेट टिटही येऊन गेला. पण फोटो काही काढता आला नाही. दरम्यान पाऊस बऱ्यापैकी पडू लागला व कापसाची शेंग भिजून गेली. शेंग काढून टाकावी का असा एक विचार आला पण शेंगेत अजूनही भरपूर कापूस होता व चक्क कोरडाठक्क. (त्या झाडाविषयी माहिती शोधताना वाचनात आले होते की ह्याचा कापूस पाण्याने भिजत नाही.) मग काय बांधायची सुतळीच जरा घट्ट केली व शेंग तशीच ठेवली.

काही दिवस झाले, चिमणीचे घरटे झाले, पिल्लेही गच्चीवर बागडून गेली व चिमणीने घरटे रिनोवेशनसाठी पुन्हा कापूस न्यायला सुरूवात केली. आता जोडीला सनबर्ड होता. तोही चष्मेवाल्यासारखा हळूच यायचा, बाकदार चोचीत जमेल तसा आणि तितका कापूस गोळा करून उडून जायचा.

मी दर काही दिवसांनी शेंग जरा उलगडून कापूस आतल्याआत सुट्टा करत असे. पण नंतर ते कामही माझ्या एका चपळ पाहुण्याने घेतले. एके दिवशी बघतो तर काय नेहमी येणारी खारुताई त्या शेंगेत तोंड आणि हात घालून काही तरी शोधत होती. त्या कापसातील बिया शोधत होती ती. मग काय हे ही रूटिन झाले. रोजच ती येऊन बिया शोधायची व तिथेच बसून खायची. आणि या नादात कापूस जो शेंगेत घट्ट कप्प्यात असे तो मोकळा होऊन शेंगे बाहेर डोकावू लागे.

एका शेंगेवर किती जण आले असा विचार करतच होतो की गेल्या आठवड्यात शिंपी (Tailor bird) या पक्ष्याने हजेरी लावली व कापसाचा आपला वाटा घेऊन गेला. आणि हे सगळे लोक (पक्षी) काय करतात या शेंगेत? असा विचार करून बुलबुलनेही एकदा कापसाची टेस्ट घेतली. अजून कोणकोण येणार कापूस घ्यायला कोण जाणे!

कापूसकोंड्याची गोष्ट म्हटलं तर एकाच ओळीची, पण संपता संपायची नाही, पण गंमत मनोरंजनही करून जायची. गच्चीतली ही कापसाची शेंग ही तशीच आहे. वीतभर छोटीशी शेंग, त्यात पसाभर कापूस. तीन महिने झाले तरी कितीतरी जणांना अजूनही उपयोगी पडत आहे. आणि त्यातला कापूसही गोष्टीसारखा संपतच नाहीये.



(शब्द व छायाचित्रे)

**– डॉ. संजय दाते**

# Giant Gentleman

A few years back I moved to the terai landscape there I had a few encounters with elephants, I was on my way to attend an elephant postmortem and one huge tusker blocked our road for 2 hrs. Another time I was on a regular camera check drive and we saw a huge tusker on the other side of the road so I thought to take a picture but in no time I found him running after our vehicle, I never had such a close sighting before, so I shrivel with the fear (there were many misconceptions)and trumpet call brought me goose bumps but later elephant sighting became common, one more time when I was staying in old forest chauki after the midnight heard of elephant entered in the premises and all night we could only hear the breaking of branches and secret sharing in among them through various vocalisation, from loud trumpet call to the soft rumbling. But every sighting engraved on my mind and my heart filled with joy. It took me a while to recognize the tracks and signs of the elephant but later it becomes fun to observe them indirectly. I must say every elephant has a different personality, they are mischievous animals, one can easily notice their presence around when seeing broken branches of the trees, huge foot marks and smelly dung. They have a wonderful social life and a matriarchal system where the oldest female leads the herd and shares a strong bond in-between them, it's a bit emotional when one sees mother and calf together, they are just like a human. Elephants are Keystone species, play an important role in seed dispersal and their dung provides shelter and food to many insects.

But the habitat alterations and linear infrastructural developments like dams, road widening, and channel construction have threatened their population in the country, every year 40-50 elephant death are recorded due to electrocutions and poaching, and many calves get separated from the herd. hence we need to save this majestic animal for the well-being of humans. Chinese folktales say "As long as the people believe in the elephant's deep wisdom, the innocent have nothing to fear," just like that if we protect the elephant we do not need to fear about our future as they are a sign of prosperity.

**-Prajakta Hoshangabadkar**
Wildlife Biologist, TATR



© AB Apana / Getty Images.

जागतिक स्थलांतरीत पक्षी दिवस -२०२२
०८ ऑक्टोबर

# जाऊया प्रवासी पक्षांच्या गावा

हजारो मैलांचा प्रवास करून समुद्र, वारा, वातावरणातील बदल व अनेक संकटे पार करून पक्षी करत असलेले स्थलांतर हे खरोखर एक आश्चर्य आहे. बदलणारे हवामान, दिवसांचा अवधी, अन्नाचा साठा इत्यादी नैसर्गिक घटना पक्षी स्थलांतरणाला प्रेरणा देतात. भारतात सुमारे १५९ प्रजातींचे पक्षी मुख्यत्वे इंडस व्हॅली मार्ग व  ब्रह्मपुत्रा नदीच्या मार्गाने स्थलांतर करून येतात. त्यामधे थापट्या-Northern Shoveller, नकटा-Knob-billed duck, छोटी लालसरी- Comman pochard, शेंडीबदक- Tufted duck, चक्रवाक- Ruddy Shelduck इ. बदके तसेच पट्टकादंब-Bar Headed Goose हे गूज येतात. चमच्या - Eurasian Spoonbill, पांढरा अवाक -Black-headed Ibis, तुतवार- common sandpiper, शेकाट्या- Blackwinged Stilt, सोन चिखल्या- Pacific Golden Plover, कुरव- Gul असे पाणथळीचे पक्षीही येतात. तसेच काळा कस्तुर- Indian Blackbird, पिवळा धोबी- Western yellow wagtail, सायबेरियन क्रौंच - Great White Crane या पक्ष्यांबरोबरच दलदल ससाणा- Marsh Harrier वैगरे शिकारी पक्षीही येतात. महाराष्ट्रात विविध प्रकारचे अधिवास असल्यामुळे ते स्थलांतरित पक्ष्यांच्या विविध गटांना आकर्षित करते.

८ ऑक्टोबर २०२२  या  जागतिक स्थलांतरित पक्षी दिन २०२२ दिनाची यंदाची थीम प्रकाश प्रदूषण (Light Pollution) आहे.

**प्रकाश प्रदूषण (Light Pollution)-**

रस्ते, व्यावसायिक, निवासी आणि औद्योगिक मालमत्ता प्रकाशित करण्यासाठी कृत्रिम प्रकाशाचा वापर केला जातो. हे सहसा सुरक्षेसाठी वापरले जाते, तर स्मारके, पूल आणि इतर खुणा रात्रीच्या वेळी सौंदर्याच्या उद्देशाने प्रकाशित केल्या जातात.

रात्रीच्या वेळी कृत्रिम प्रकाशाचा वापर जगभरात वाढत आहे. उपग्रह निरीक्षणातून असे दिसून आले की सन २०१२ ते सन २०१६ पर्यंत, कृत्रिमरित्या प्रज्वलित बाहेरील भागात दरवर्षी २.२% वाढ झालेली आहे.

**प्रकाश प्रदूषणाचा स्थलांतरित पक्ष्यांवर होणारा परिणाम-**

प्रकाशाच्या वाढत्या वापरामुळे नैसर्गिक वातावरणात नाटकीय बदल झाले आहेत आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या अनेक प्रजातींसह वन्य प्राण्यांवर विपरीत परिणाम झाला आहे.

प्रकाश प्रदूषण पक्ष्यांचे वर्तन बदलू शकते, ज्यात स्थलांतर, चारा आणि स्वर संवाद यांचा समावेश होतो. हे त्यांच्या क्रियाकलाप पातळी आणि त्यांच्या ऊर्जा खर्चावर देखील परिणाम करते. रात्री स्थलांतर करणारे पक्षी विशेषतः प्रकाश प्रदूषणास सामोरे जातात. प्रकाश प्रदूषण निशाचर स्थलांतरित पक्ष्यांना आकर्षित करते आणि विचलित करते, ज्यामुळे पक्षी प्रकाशमय भागात फिरू लागतात. परिणामी त्यांच्या उर्जेचा साठा कमी करतात आणि त्यांना थकवा, शिकार आणि प्राणघातक टक्कर होण्याचा धोका निर्माण होतो. प्रत्येक वर्षी, प्रकाश प्रदूषणामुळे इमारती आणि इतर बांधलेल्या पायाभूत सुविधांच्या टक्करांमुळे लाखो पक्ष्यांच्या मृत्यू होत आहे. विशेषतः जेव्हा कमी ढग, धुके किंवा पाऊस असतो आणि ते कमी उंचीवर उडत असतात त्यावेळी स्थलांतरित पक्षी प्रकाशाकडे आकर्षित होतात.

**प्रकाश प्रदूषणावरील उपाय-**

प्रकाश प्रदूषणावरील उपाय सहज उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, जगातील अधिकाधिक शहरे वसंत ऋतु आणि शरद ऋतूतील स्थलांतराच्या टप्प्यात बिल्डिंग लाइट मंद करण्यासाठी उपाययोजना करत आहेत. या वाढत्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि पक्ष्यांना सुरक्षितपणे स्थलांतर करण्यास मदत करण्यासाठी जागतिक स्तरावर कारवाई केली जाईल याची खात्री करण्यासाठी स्थलांतरित प्रजातींच्या अधिवेशनांतर्गत सर्वोत्तम सराव मार्गदर्शक तत्त्वे देखील विकसित केली जात आहेत.

जागतिक स्थलांतरित पक्षी दिवस ही स्थलांतरित पक्षी आणि त्यांच्या अधिवासाच्या संवर्धनाची गरज अधोरेखित करणारी वार्षिक जागरूकता वाढवणारी मोहीम आहे. याचा जागतिक प्रसार आहे आणि स्थलांतरित पक्ष्यांना भेडसावणारे धोके, त्यांचे पर्यावरणीय महत्त्व आणि त्यांचे संवर्धन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज याबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यात मदत करण्यासाठी हे एक प्रभावी साधन आहे.

**- प्रशांत खैरनार**
प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी



**"Chandrama"** is published by the Chandrapur Forest Academy of Administration, Development and Management, Chandrapur and printed at Renuka Publications, Chandrapur. The views and opinions expressed in the articles are those of the authors and do not necessarily reflect the official policy or position of the publisher. Reproduction of any content is not allowed without a written permission of the publisher.
Please share your feedback / inputs on **chandrama.cfa@gmail.com**
Editor in Chief : **Maheep Gupta**, APCCF & Director, Chandrama | Executive Editor : **Piyusha Pramod Jagtap**, Addl. Director (Training) |
Editor : **Manisha Bhinge**, Dy Director | Guest Editor : **Shatanik Bhagwat**, DFO, Student Editor - **Nikhil Patil**, RFO OT